Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सत्याचे प्राईम्स सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

पावसाळी वातावरणाने ग्रामीण भागाला नवे रूप

(पान २ वर)



। गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ । अंक १३९ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

## Selected

### सिया गोयलला कारागृहात VIP ट्रीटमेंट?

पुणे : पुणे जिल्ह्यातील लोहगड येथील केतन अग्रवाल हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी सिया गोयल सध्या तुरुंगात असून तिला व्हीआयपी ट्रीटमेंट दिली जात असल्याचा संशय रिपब्लिकन सोशलिस्ट पक्षाने व्यक्त केला आहे. तसेच या प्रकरणाची चौकशी करावी आणि पोलिसांनी वेळेत तपास पूर्ण करून फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवावा, अशी मागणी देखील रिपब्लिकन सोशलिस्ट पक्षाने केली आहे. बुधवारी (दि. 26) या विषयावर पुण्यातील पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदमध्ये ही मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, पैशांच्या आणि प्रभावाच्या बळावर आरोपींना जेलमध्ये अशा सवलती मिळणे अत्यंत गंभीर असून, यामुळे संपूर्ण तपास प्रक्रियेवर आणि पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत आरोपींविरोधात कठोर कारवाईची मागणी यावेळी करण्यात आली.

### ऊर्जा प्रकल्प-पूल वाहून गेले; 133 भारतीय बेपत्ता, कैलास मानसरोवर यात्रेला जात होते

# नेपाळमध्ये पुरामुळे विध्वंस,100 मृत्यू!

## १३३ भारतीय आणि ३०० हून अधिक परदेशी पर्यटक बेपत्ता

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली । बुधवारी सकाळी ९ वाजता नेपाळ-तिबेट सीमेवर आलेल्या अचानक आलेल्या पुरामुळे नेपाळच्या रसुवा जिल्ह्यात प्रचंड विध्वंस झाला. सकाळी ९ वाजता, तिबेटमधील भोटेकोशी नदीच्या पाण्याच्या अचानक आलेल्या लोंढ्याने या भागाला वेढले आणि अनेक भाग पाण्याखाली गेले.**

नेपाळ पोलिसांच्या माहितीनुसार, आतापर्यंत १०० लोकांचा मृत्यू झाला आहे. नेपाळ पर्यटन विभागाच्या माहितीनुसार, १३३ भारतीय आणि ३०० हून अधिक परदेशी पर्यटकांसह १,००० हून अधिक लोक बेपत्ता आहेत. नेपाळी अधिकाऱ्यांच्या मते, आणखी एका पुराचा धोका निर्माण झाला आहे. ज्या हिमनदीच्या सरोवरामुळे हा अचानक पूर आला, त्या ठिकाणी सुमारे ७ मीटर उंचीचे एक धरण अजूनही आहे आणि ते कोणत्याही क्षणी कोसळू शकते.प्राथमिक वैज्ञानिक मूल्यांकनानुसार, बर्फ आणि खडकांचा एक मोठा तुकडा ल्हेंडे नदीत पडला, ज्यामुळे तिचा



मार्ग अडवला गेला आणि पाणी साचले.

हा अडथळा नंतर फुटला आणि साचलेले पाणी वेगाने प्रवाहाच्या दिशेने वाहून गेले, ज्यामुळे अचानक पूर आला. हिमनदी सरोवराच्या स्फोटाची (GLOF) शक्यता देखील तपासली जात आहे. त्यावेळी रसुवामध्ये मुसळधार पाऊस नव्हता. तथापि, भूकंपाचाही संशय व्यक्त केला जात आहे. सकाळी ८:३७ वाजता ४.४ तीव्रतेचा भूकंप झाला. पूर देखील याच सुमारास आला, त्यामुळे त्याचा संबंध तपासला जात आहे.या पुराचा फटका रसुवा, नुवाकोट, धादिंग आणि चितवन येथील भागांना बसला. रसुवामधील तिमुरे, स्याफ्रुबेसी, हाकुबेसी, मेलुंग, सालेतार, शांतीबाजार, परेबेसी, खाल्टी बस्ती आणि बेट्रावती यांसह जवळपास डझनभर वस्त्यांना फटका बसला. पुराचे पाणी धादिंगमधील गालचीपर्यंत पोहोचले असून, मुग्लिनच्या दिशेने ते आणखी पुढे सरकण्याचा इशारा देण्यात आला आहे. बेट्रावती ते रसुवागढी-तिबेट सीमेपर्यंतचा सुमारे ४२ किलोमीटरचा रस्ता पूर्णपणे खराब झाला. याव्यतिरिक्त, स्याफ्रुबेसी ते सीमेपर्यंतचा १६ किलोमीटरचा रस्ता खराब झाला. भारतात, याचा परिणाम प्रामुख्याने बिहारमधील गंडक नदी आणि तिच्याशी संबंधित लहान-मोठ्या नद्यांवर होण्याची शक्यता आहे. नेपाळमधून येणाऱ्या ३ मीटर उंचीच्या लाटेसाठी पुराचा इशारा देण्यात आला आहे. पश्चिम चंपारण, पूर्व चंपारण, गोपालगंज, सारण, मुझफ्फरपूर आणि वैशाली येथे विशेष दक्षता ठेवण्यात येत आहे. सीतामढी आणि शिवहरवरही लक्ष ठेवून आहेत. नेपाळमधील पाणी त्रिशुली नदीमार्गे गंडक नदीत पोहोचेल. यानंतर, बिहारच्या सखल भागांमध्ये पाण्याची पातळी वाढू शकते. पुढील ५-६ तास अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत. तथापि, या सर्व भागांमध्ये पूर येईल की नाही, हे अद्याप निश्चित नाही.

### जागतिक बँक २५ अब्ज रुपये देणार


नेपाळच्या अर्थ मंत्रालयानुसार, जागतिक बँकेने पूरग्रस्त भागांतील मदत आणि पुनर्रचना कार्यासाठी नेपाळला २५ अब्ज रुपयांची आपत्कालीन मदत देऊ केली आहे. पुराची बातमी पसरताच, नेपाळमधील जागतिक बँकेचे कंट्री डायरेक्टर डेव्हिड सिस्लेन यांनी अर्थमंत्री स्वर्णिम वागळे यांना कळवले की, आपत्कालीन मदत म्हणून विविध स्रोतांमधून २५ अब्ज नेपाळी रुपयांपर्यंत निधी उभारला जाऊ शकतो.नेपाळमधील विनाशकारी पुराचा सामना करण्यासाठी भारताने १० टन मानवतावादी मदत आणि अत्यावश्यक औषधे पाठवली आहेत.

# पेपरफुटीनंतर आता बोगस गुणपत्रिका रॅकेटचा पर्दाफाश

## चंद्रपुरात एकास अटक, अलिशान गाड्या मार्कलिस्ट जप्त

**जन सम्राट टाईम्स**

**चंद्रपुर | प्रतिनिधी:** राज्यातील पेपरफुटीच्या (Paper Leak) घटनांवरुन सध्या राज्यभर संताप व्यक्त होत असून नुकतेच 22 मार्च रोजी घेण्यात आलेल्या MPSC परीक्षेचाही (Exam) पेपर फुटल्याचं आता सिद्ध झाला आहे. सरकारने ती परीक्षा रद्द केली असून नव्याने उमेदवारांना परीक्षा द्यावी लागणार आहे. याप्रकरणी, आत्तापर्यंत 6 आरोपींना अटक करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. एकीकडे प्रवेश परीक्षा, स्पर्धा परीक्षांच्या पेपरफुटीचा मुद्दा गाजत असताना दुसरीकडे चंद्रपुरात बोगस गुणपत्रिकेची घटना समोर आली आहे. विविध विद्यापीठाच्या बनावट गुणपत्रिका आणि पदवी रॅकेटचा चंद्रपुरात (Chandrapur) पर्दाफाश करण्यात आला असून एका आरोपीस पोलिसांनी अटक केली आहे. या बोगस गुणपत्रिका प्रकरणातील मुख्य सूत्रधार फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. शिक्षणाची पंढरी असलेल्या पुणे विद्यापीठातून बोगस पदवी प्रमाणपत्र देण्याबाबत पैशांची मागणी केल्याचा आरोप एका रिक्षाचालकाने केला होता. त्यानंतर, हे प्रकरण चांगलंच गाजलं. त्यावर, विद्यापीठाने माहितीही दिली. आता, पुन्हा एकदा शिक्षण क्षेत्राला हादरविणाऱ्या एका मार्कशीट आणि पदवी रॅकेटचा पर्दाफाश चंद्रपूरच्या दुर्गापूर पोलिसांनी केला आहे. या प्रकरणी



वैभव सोनूले नामक एका आरोपीस अटके करण्यात आली असून रॅकेटचा मुख्य सूत्रधार मात्र फरार आहे. मुख्य सूत्रधार मूळ चंद्रपूरचा असून सध्या राज्याच्या विविध भागात वास्तव्याला असल्याची प्राथमिक माहिती पुढे आली आहे. पोलिसांनी या आरोपींकडून 2 आलिशान वाहने जप्त केली आहेत. आरोपींनी लाभार्थ्यांकडून प्रत्येक गुणपत्रिका आणि पदवी यासाठी 5 ते 10 लाख रु. घेतले जात होते, अशी माहिती समोर आली आहे. पोलीस तपास सध्या प्राथमिक अवस्थेत असून आरोपींची एकूण मोडस ऑपरेंडी आणि व्याप्ती लक्षात घेता अनेक धक्कादायक बाबी उजेडात येण्याची शक्यता असल्याचे दुर्गापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, संतोष शेवगावकर यांनी म्हटले. आधीच नोकरीत असलेल्या आणि बढतीसाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांनी देखील या आरोपींकडून सर्वाधिक उच्च पदव्या मिळविल्या असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे, या घटनेने शैक्षणिक आणि प्रशासकीय नोकर वर्तुळ मात्र हादरले आहे.

# टीव्हीवर नेत्यांचा बोलबाला, पण सोशल मीडियावर मुंढेंचीच क्रेझ

**जन सम्राट टाईम्स**



**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** महाराष्ट्राच्या राजकारणात आणि प्रशासनात आपल्या कडक शिस्तीसाठी ओळखले जाणारे धडाडीचे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे (Tukaram Mundhe) आता सोशल मीडियावरही जबरदस्त लोकप्रिय ठरत आहेत. इन्स्टाग्राम असो वा 'X' (ट्विटर), फॉलोअर्सची संख्या आणि पोस्टवर मिळणारा डिजिटल प्रतिसाद (Engage-ment Rate) पाहिला तर राजकीय नेत्यांच्या तुलनेत मुंढेंचा प्रभाव अधिक ठळकपणे समोर येत आहे. कमी पोस्ट्स आणि प्रचंड प्रतिसाद यामुळे तुकाराम मुंढे हे केवळ एक अधिकारी न राहता सोशल मीडियावरील एक मोठा 'डिजिटल ब्रँड' बनले आहेत. त्यामुळे सोशल मीडिया रीच आणि एंगेजमेंट रेटमध्ये त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मागे टाकलं आहे. तुकाराम मुंढे यांचे अधिकृत व्हेरिफाइड फेसबुक पेज उपलब्ध नसल्याने फेसबुकची थेट तुलना करता येत नाही. पण उपलब्ध आकडेवारीतून एक गोष्ट स्पष्ट दिसते. फॉलोअर्सची संख्या एक गोष्ट... आणि त्या फॉलोअर्सचा प्रत्यक्ष प्रतिसाद मिळवणं ही दुसरी गोष्ट! नेत्यांकडे फॉलोअर्स मोठ्या संख्येने आहेत... पण तुकाराम मुंढेंच्या पोस्टवर एंगेजमेंट रेट (Engagement Rate) मोठ्या प्रमाणात दिसतोय. नेते विरुद्ध अधिकारी या तुलनेत सोशल मीडिया एंगेजमेंटचं हे गणित तुकाराम मुंढेंच्या बाजूने झुकलेलं दिसतंय! आज सोशल मीडिया हा केवळ मनोरंजनाचा भाग राहिलेला नाही. अन्न-औषध प्रशासन असो, आरोग्य असो, शिक्षण असो किंवा नागरिकांच्या रोजच्या जीवनाशी संबंधित कोणताही प्रश्न असो... प्रशासन आणि नागरिकांमधला संवादही आता सोशल मीडियावर होत आहे. म्हणूनच एखाद्या अधिकाऱ्याच्या कामाची चर्चा किती होते... यापेक्षा त्यावर लोकांचा प्रतिसाद किती उमटतो... हेही तितकंच महत्त्वाचं ठरतंय. म्हणूनच...राजकारणात नेते... पण सोशल मीडियावर मुंढेंची क्रेझ दिसत आहे, आणि याच डिजिटल प्रतिसादामुळे तुकाराम मुंढे हे केवळ लोकप्रिय अधिकारी नाहीत, तर सोशल मीडियावर स्वतःचा वेगळा ब्रँड निर्माण करणारे अधिकारी ठरत आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणात आणि प्रशासनात आपल्या कडक शिस्तीसाठी ओळखले जाणारे धडाडीचे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे (Tukaram Mundhe) आता सोशल मीडियावरही जबरदस्त लोकप्रिय ठरत आहेत.

### एकाच कुटुंबातील सहा मृतदेह तलावात आढळले

नवी दिल्ली : शहराबाहेरील ऐतिहासिक भूतनाळ तलावात एकाच कुटुंबातील सहाजणांचे मृतदेह आढळून आले आहे. मृतांमध्ये एका महिलेचा आणि तिच्या ५ मुलांचा समावेश आहे. ही घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली. ६ जणांचे मृतदेह तरंगताना आढळून आल्यावर पोलिसांना माहिती देण्यात आली. खळबळ उडाली असून मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. विजापूर जिल्ह्यातील तोरवी गावातील शांतीनगर येथील शोभा मल्लिकार्जुन जालगेरी विद्या जालगेरी सुवर्णा जालगेरी तिप्पराय जालगेरी सानिका जालगेरी आणि विकास जालगेरी (०६) अशी मृतांची नावे आहेत.

# मी चोरून खायचो आणि आंदोलन करायचो : नरहरी झिरवळ

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** पुण्यातील मांजरी येथे आदिवासी विद्यार्थ्यांचे आंदोलन (Adivasi Andolan Pune Protest) सुरू असून, आंदोलनस्थळी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके आणि मंत्री नरहरी झिरवळ (Narhari Zirwal ) यांनी भेट देत विद्यार्थ्यांशी चर्चा केली. यावेळी दोन्ही मंत्र्यांनी विद्यार्थ्यांना आमरण उपोषण सोडण्याची विनंती केली. मात्र, विद्यार्थी आपल्या आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम आहेत. जोपर्यंत मागण्यांबाबत लेखी जीआर मिळत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे. या आंदोलनात हजारो



विद्यार्थी सहभागी झाले असून, काही विद्यार्थी आमरण उपोषणाला बसले आहेत. दरम्यान, मंत्री आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते नरहरी झिरवळ यांनी आंदोलनास्थळी केलेल्या विधानाची चर्चा सध्या राज्यभर सुरु आहे.

शिष्टमंडळाशी चर्चा करून झाल्यानंतर नरहरी झिरवळ आणि अशोक उईके हे आंदोलन स्थळी भेट देण्यासाठी आले. यावेळी नरहरी झिरवळ यांनी विद्यार्थ्यांना तुम्ही खाऊन पिऊन आंदोलन करा असा सल्ला दिला. हे सांगत असतानाच आंदोलनकर्ते विद्यार्थ्यांनी नरहरी झिरवळांना उत्तर दिलं की, आम्ही खाऊन पिऊन आंदोलन करायचा असते तर तुम्ही तर आले नसते. आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना असा सल्ला देऊन नरहरी झिळवळांनी या आंदोलनाची मस्करी केली आहे अशी चर्चा सुरू झाली. दरम्यान, आपल्या विविध 14 मागण्यांसाठी पुण्याच्या मांजरी परिसरात गेल्या 14 दिवसांपासून उपोषणाला बसलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी राज्य सरकारकडून हालचाली सुरू झाल्या आहेत.आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी 15 जणांच्या विद्यार्थी शिष्टमंडळासोबत तब्बल 5 तास प्रदीर्घ बैठक घेतली. चर्चा सकारात्मक झाल्याचं सांगितलं जात असलं तरी उपोषणावर कोणताही ठोस तोडगा निघू शकलेला नाही. मंत्र्यांनी मागण्यांवर विचार करण्यासाठी दोन दिवसांची मुदत मागून उपोषण मागे घेण्याची विनंती केली, मात्र जोपर्यंत मागण्या मान्य झाल्याचे लेखी आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याच्या भूमिकेवर विद्यार्थी ठाम आहेत. दरम्यान, 14 दिवसांच्या उपोषणामुळे काही विद्यार्थ्यांची प्रकृती खालावल्याची चिंताजनक माहिती समोर येत आहे. आदिवासी विभागाचा मंत्री आणि एक पालक म्हणून मी विद्यार्थ्यांशी अत्यंत सकारात्मक चर्चा केली आहे. आमची पोरं-पोरी आपल्या हक्कासाठी बोलू लागली आहेत, याचा मला अभिमान आहे. विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर आमचे कोणतेही अडले नाही. काही तांत्रिक बाबींवर विचार करण्यासाठी आणि निर्णय घेण्यासाठी दोन दिवसांचा वेळ मागितला आहे.

**जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज**

# आम्ही रेल्वे फिरु देणार नाही, विमानं उडू देणार नाही

## मुंबईत येतच असतो, मुंबईतील आंदोलन बंदीवरुन भडकले जरांगे पाटील

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** मराठा आरक्षण आणि कुणबी जात प्रमाणपत्राच्या मुद्द्यावरुन उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील पुन्हा आक्रमक झाले असून 29 ऑगस्ट रोजी त्यांनी उपोषणाला बसण्याची घोषणा केली आहे. तसेच, गरज पडल्यास पुन्हा एकदा आपला मोर्चा मुंबईच्या दिशेने वळवणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केले आहे. मात्र, दक्षिण मुंबईतील आंदोलनांसाठी राज्य सरकारने नवे नियम लागू केले आहेत. आझाद मैदानाव्यतिरिक्त दक्षिण मुंबईतील (MUMBAI) अन्य कोणत्याही ठिकाणी आंदोलन, धरणे किंवा मोर्चा काढण्यास मनाई केली आहे. मराठे मुंबईत जाणार आहे, त्यामुळे मुद्दामून



सरकारने हे केलं, यात झाकून ठेवण्यासारखं काहीच नाही, असे म्हणत जरांगे पाटील यांनी सरकारला लक्ष्य केलं. सरकार विरोधात जात आहे, लोकांनी यांना सत्तेवर बसवले, मराठ्यांनी यांना सत्तेवर बसवले. मात्र, त्याच गोरगरीब मराठ्यांना मुंबईत येण्यापासून रोखणं म्हणजे विरोध वाढण्याचे कारण फक्त सरकार आहे. कायदा तुमच्या हातात आम्ही देतो, सत्ता आम्ही तुमच्या हातात देतो आणि तुम्ही त्याचा गैरवापर करता. लोक यासाठी तुम्हाला निवडून देतात की, आपण कसल्याही परिस्थितीत मुंबईला जरी गेलो, तरी आपलं सरकार तिथे आहे. आपले फडवणीस, आपले शिंदे, आपले दादा तिथे बसले आहेत. जे आपले म्हणून बसवले तेच मुंबईत येऊ नका म्हणतात, ही खूप मोठी दहशत झाली. ही सरकारची दादागिरी झाली, ही चालत नसते असेही जरांगे पाटील यांनी म्हटले. आमच्यापुढे दादागिरी करायची नाही. मग,

### जरांगे पाटलांनी सरकारवर हल्लाबोल केला

एखाद्या वेळेस नक्की होईल. मात्र, आम्हाला दहा-पंधरा दिवस सांभाळून घ्या, आम्ही तुमचेच आहोत, लोकाचे नाही. मुंबईत कोणीच सुखी नाही, आम्ही त्यांना नीट करायला यायला लागलो. जर ठरलं तर मुंबईत येणार, वर्षावरच येणार, तुमच्या बापाची पेंड आहे का? इकडे येऊ नको, तिकडे येऊ नको म्हणायला, असे म्हणत जरांगे पाटलांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

आम्ही मुंबईत सगळीकडं आंदोलन करत असतो, विरोध केला तर रेल्वे फिरू देणार नाही, तुमची विमानं उडू देणार नाही. आम्ही कुणाला मोजत नसतो आणि ऐकतही नसतो. आम्ही कायद्याचा सन्मान करतो, आम्ही तुम्हाला परवानगीचा अर्ज दिला आहे. तुम्ही परवानगी द्या, नाहीतर नका देऊ. मी जात असतो, आमचं जायचं ठरल तर मी जाणार, रात्रंदिवस बसणार तुम्ही काय करणार ते आम्ही बघणार? तुम्ही मुंबईत कसे अडवतात हे पण बघतो, असे म्हणत मनोज जरांगेंनी मुंबईत आंदोलन करणारच अशी ठाम भूमिका मांडली. तुम्हाला मुंबईत अडथळा नको तर आमचे प्रश्न सोडवा, तुम्हाला प्रश्न सोडवायचे नाही तर सत्तेतही बसायचं नाही. मुंबईतील बांधवांनी समजून घ्यावे, आमच्यामुळे तुम्हाला त्रास होईल का?

वंचितांचा, शोषितांचा निर्भीड आवाज

दैनिक जन सत्याचे प्राईम्स सम्राट टाईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल...

डिजिटल युगात वेगवान, निर्भीड आणि सत्याला प्राधान्य देणारे दैनिक जन सम्राट टाईम्स!

- तुम्हालाही पत्रकारितेची आवड आहे का?
- समाजातील प्रश्न मांडण्याची जिद्द आहे का?
- तुमच्या परिसरातील बातम्या जगापर्यंत
- पोहोचवायच्या आहेत का?

मग हीच तुमच्यासाठी सुवर्णसंधी!

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका आणि गावासाठी वार्ताहर / प्रतिनिधी पाहिजेत



अनुभव असो वा नसो
– उत्साह आणि प्रामाणिकपणा महत्त्वाचा
डिजिटल पत्रकारितेचे प्रशिक्षण व मार्गदर्शन उपलब्ध
तुमच्या आवाजाला मिळेल राज्यभर व्यासपीठ

संपर्क करा (Call / WhatsApp)
+91 93254 87889 / 9270187889
- संपादक -
मुकुंदराव शामराव नंन्नवरे
ईमेल : Jansamrattimes@gmail.com -
वेबसाईट : https://jansamrattimes.in
आजच संपर्क करा...
तुमचा आवाज बना जनतेचा आवाज!

# मलकापूरच्या राजकारणात पुन्हा रंगणार 'एकडे विरुद्ध संचेती' सामना?

## बुलढाणा जिल्हा बँक निवडणुकीच्या निकालानंतर राजकीय चर्चेला उधाण

जन सम्राट टाईम्स

**मलकापूर | प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेच्या निवडणूक निकालानंतर मलकापूर विधानसभा मतदारसंघातील राजकीय समीकरणांची पुन्हा एकदा चर्चा रंगू लागली आहे. २०१९मध्ये काँग्रेसचे राजेश एकडे यांनी बाजी मारली, तर २०२४मध्ये भाजपचे चैनसुख संचेती यांनी जोरदार पुनरागमन करत विजय मिळवला. त्यामुळे आता २०२९च्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा 'चैनसुख संचेती विरुद्ध राजेश एकडे' असा सामना रंगणार का, की दोन्ही पक्षांकडून नवा चेहरा मैदानात उतरणार, याबाबत राजकीय वर्तुळात आतापासूनच तर्क-वितर्क सुरू झाले आहेत. २०१९च्या विधानसभा निवडणुकीत राजेश एकडे यांना ८६ हजार २७६ मते (४६.७९ टक्के) मिळाली होती. त्यांच्याविरोधात चैनसुख संचेती यांना ७१ हजार ८९२ मते (३८.९९ टक्के) मिळाली.

एकडे यांनी तब्बल १४ हजार ३८४ मतांनी विजय मिळवत भाजपला धक्का दिला होता. मात्र २०२४मध्ये राजकीय चित्र पूर्णपणे बदलले. चैनसुख संचेती यांनी १ लाख ९ हजार ९२१ मते (५३.२४ टक्के) मिळवत विजय मिळवला, तर राजेश एकडे यांना ८३ हजार ५२४ मते (४०.४६ टक्के) मिळाली. संचेती यांनी २६ हजार ३९७ मतांच्या मोठ्या फरकाने विजय मिळवत





२०१९चा राजकीय हिशेब उलटवून टाकला. दोन निवडणुका, दोन वेगळी राजकीय चित्रे! २०१९मध्ये काँग्रेसच्या बाजूने गेलेला मतदारांचा कौल २०२४मध्ये भाजपच्या बाजूने झुकल्याचे निवडणूक आकडेवारीतून दिसून आले. त्यामुळे २०२९मध्ये मतदार पुन्हा जुन्या चेहऱ्यांवर विश्वास ठेवणार की नव्या नेतृत्वाला संधी देणार, हा प्रश्न मलकापूरच्या राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू बनला आहे. दरम्यान, २०१९मध्ये वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराला १२ हजार ५४९ मते (६.८१ टक्के) मिळाली होती. २०२४मध्ये ही संख्या ९ हजार ३१६ (४.५१ टक्के) इतकी राहिली. त्यामुळे आगामी निवडणुकीत तिसऱ्या आघाडीची भूमिका, मतविभाजन आणि त्याचा प्रमुख पक्षांच्या विजय-पराजयावर होणारा परिणामही महत्त्वाचा ठरू शकतो. २०२९ची रंगत आतापासूनच! २०१९मध्ये एकडे, २०२४मध्ये संचेती—या दोन निवडणुकांनी मलकापूरच्या राजकारणातील बदलते चित्र स्पष्ट केले आहे. त्यामुळे २०२९मध्ये पुन्हा दोन्ही प्रमुख नेते आमनेसामने येणार का, २०२४ची आघाडी भाजप कायम ठेवणार का, काँग्रेस पुन्हा मुसंडी मारणार का, की नव्या चेहऱ्याला संधी देत दोन्ही पक्ष राजकीय प्रयोग करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र २०२९ची विधानसभा निवडणूक अद्याप दूर आहे. उमेदवारीचा निर्णय, पक्षीय आघाड्या, स्थानिक राजकीय समीकरणे, संघटनात्मक ताकद आणि मतदारांचा बदलता कल यावर अंतिम चित्र निश्चित होणार आहे. त्यामुळे सध्याच्या जिल्हा बँक निवडणुकीच्या निकालाकडे आगामी राजकीय समीकरणांची दिशा दाखवणारा संकेत म्हणून पाहिले जात आहे. मलकापूरच्या राजकारणात 'जैसे थे' राहणार की नवा अध्याय सुरू होणार? २०१९चा चेहरा, २०२४चा विजेता आणि २०२९चा संभाव्य नवा चेहरा—या तिन्ही शक्यतांमुळे विधानसभा निवडणुकीची राजकीय चर्चा आतापासूनच रंगू लागली आहे.

# पावसाळी वातावरणाने ग्रामीण भागाला नवे रूप



जन सम्राट टाईम्स

**परभणी | प्रतिनिधी :** पावसाळ्याच्या दिवसांत ग्रामीण भागातील शेतशिवार हिरवाईने नटले असून, सर्वत्र प्रसन्न आणि आल्हाददायक वातावरण निर्माण झाले आहे. पावसामुळे शेतजमिनीला नवचैतन्य प्राप्त झाले असून, बहरलेली हिरवीगार पिके आणि दाट ढगांनी परिसराचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत आहे.

विस्तीर्ण शेतजमीन, दाट हिरवी पिके, झाडाझुडपांनी व्यापलेला परिसर आणि आकाशात दाटून आलेले ढग, असे नयनरम्य दृश्य सध्या ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांपासून वातावरणात झालेल्या बदलामुळे शेती परिसरात चैतन्य निर्माण झाले आहे.

हिरव्यागार शेतांमुळे ग्रामीण भागाचे निसर्गसौंदर्य खुलून दिसत असून, पिकांची वाढ समाधानकारक होत असल्याने शेतकऱ्यांमध्येही समाधानाचे वातावरण आहे. ढगाळ वातावरण आणि चहूबाजूंनी पसरलेली हिरवाई यामुळे परिसरातील निसर्गरम्य दृश्य नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. पावसाळ्यातील ही हिरवाई ग्रामीण महाराष्ट्राच्या समृद्ध कृषी संस्कृतीचे आणि निसर्गाशी असलेल्या घट्ट नात्याचे सुंदर दर्शन घडवित आहे. शेतशिवारातील बहरलेली पिके आणि निसर्गाची मनमोहक साथ यामुळे ग्रामीण भागाला जणू नव्या रूपाची झालर लाभली आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर अद्याप तोडगा नाहीच!

## सरकारला तीन दिवसांची मुदत



जन सम्राट टाईम्स

**पुणे | प्रतिनिधी :** पुण्यातील मांजरी परिसरात आदिवासी विद्यार्थ्यांचे विविध मागण्यांसाठी सुरू असलेले आंदोलन अद्यापही कायम आहे. गेल्या १४ दिवसांपासून विद्यार्थी आंदोलनावर ठाम असून, राज्य सरकारने वयोमर्यादेच्या मागणीसंदर्भात स्थगिती देण्याचा निर्णय घेतला असला तरी इतर मागण्यांवर ठोस निर्णय झालेला नसल्याने आंदोलकांनी आंदोलन मागे घेण्यास नकार दिला आहे. दरम्यान, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी आज आंदोलनस्थळी भेट देत विद्यार्थ्यांशी सविस्तर चर्चा केली. मंत्री उईके यांच्या भेटीनंतर काही मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली असली तरी विद्यार्थ्यांना अपेक्षित असलेला ठोस निर्णय अद्याप झालेला नाही.

त्यामुळे आंदोलनाचा तिढा कायम असून, सरकारला मागण्यांवर कार्यवाही करण्यासाठी विद्यार्थ्यांनी दोन ते तीन दिवसांची मुदत दिली आहे. १४ मागण्यांवर झाली सविस्तर चर्चा आंदोलक विद्यार्थ्यांशी चर्चा केल्यानंतर मंत्री डॉ. अशोक उईके यांनी पत्रकारांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांसोबत सकारात्मक आणि चांगला संवाद झाल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली असून, एकूण १४ मुद्द्यांवर चर्चा झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "आमच्या विद्यार्थ्यांसोबत चांगला संवाद झाला. त्यांच्या माध्यमातून त्यांनी आम्हाला दोन-तीन दिवसांचा वेळ दिला आहे. काही गोष्टी त्यांना अपेक्षित आहेत, त्यावर आम्ही काम करू. आमची मुले आहेत, आम्ही त्यांचे आहोत," अशी भूमिका मंत्री उईके यांनी मांडली. विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत संबंधित मागण्यांबाबत आवश्यक कार्यवाही करून त्याचा ड्राफ्ट तयार करून देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. '१२ हजार ५०० बोगस लोकांच्या याद्या द्या' दरम्यान, आंदोलक विद्यार्थ्यांनी सरकारसमोर आपल्या मागण्या स्पष्टपणे मांडल्या आहेत. चर्चेदरम्यान काही मागण्या तांत्रिक स्वरूपाच्या असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. विशेषतः १२ हजार ५०० बोगस लोकांच्या याद्या उपलब्ध करून देण्याची मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे. तसेच पुढील भरती प्रक्रिया नेमकी कशी राबविण्यात येणार आहे, त्याचे वेळापत्रक आणि संपूर्ण कार्यपद्धती ड्राफ्टच्या माध्यमातून स्पष्ट करावी, अशी मागणीही विद्यार्थ्यांनी केली आहे.

# मरी माता यात्रेत संस्कार, संस्कृती आणि सामाजिक एकतेचा अनुकरणीय आदर्श

## कानळदा येथील कुंभार समाजाचा स्तुत्य उपक्रम

जन सम्राट टाईम्स

**कानळदा, ता. जि. जळगाव । प्रतिनिधी:** कानळदा येथे २५ ऑगस्ट २०२६ रोजी मरी माता यात्रेचा सोहळा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. दरवर्षीप्रमाणे यंदाही ग्रामस्थांनी यात्रेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विशेषतः कुंभार समाज बांधवांचा यात्रेच्या आयोजनात अग्रगण्य सहभाग राहिला. मात्र यंदाच्या यात्रेचे वैशिष्ट्य केवळ उत्सवाच्या उत्साहात नव्हते, तर संस्कार, संस्कृती, भक्ती आणि सामाजिक एकतेचा सकारात्मक संदेश देणाऱ्या उपक्रमात होते. दरवर्षी यात्रेनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या लोकनाट्य तमाशाऐवजी यंदा कुंभार समाज बांधवांनी सांप्रदायिकतेचा प्रचार-प्रसार, भारतीय हिंदू संस्कृतीचे जतन आणि संस्कारमूल्यांची जोपासना या उद्देशाने ह. भ. प. परमपूज्य स्वामी विद्यानंदजी सागर महाराज बाबा, लातूर यांच्या कीर्तन सोहळ्याचे आयोजन केले. या भक्तिमय सोहळ्याला हजारो भाविकांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आबालवृद्धांपासून




तरुणाईपर्यंत सर्वच ग्रामस्थांनी या उपक्रमात मनापासून सहभाग घेतला. कीर्तनाच्या माध्यमातून भक्ती, अध्यात्म, संस्कार आणि सकारात्मक विचारांचा जागर करण्यात आला. त्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. मनोरंजनाऐवजी संस्कारांचा विधायक पर्याय आजच्या काळात उत्सव आणि यात्रांच्या निमित्ताने अनावश्यक धांगडधिंगा, गाण्यांचा गजर तसेच त्यातून वाद-विवाद आणि भांडणांना खतपाणी मिळण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर कानळदा येथील कुंभार समाजातील अबालवृद्ध आणि तरुण पिढीने एकविचाराने पुढाकार घेत मनोरंजनाला पर्याय म्हणून संस्कारक्षम आणि विधायक उपक्रम समाजासमोर ठेवला आहे. 'केवळ शिक्षणाने नव्हे, तर संस्काराने माणूस मोठा होतो,' हा विचार कुंभार समाज बांधवांनी आपल्या कृतीतून अधोरेखित केला. यात्रेच्या माध्यमातून केवळ मनोरंजन न करता भक्ती, संस्कृती, संस्कार आणि सामाजिक एकतेचा संदेश देण्याचा त्यांचा प्रयत्न ग्रामस्थांसाठी प्रेरणादायी ठरला. ग्रामपंचायतीतर्फे कुंभार समाजाचा गौरव या स्तुत्य आयोजनाबद्दल कानळदा ग्रामपंचायतीच्या वतीने कुंभार समाज बांधवांचा छोटेखानी कौतुक सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी समाजबांधवांचे शब्दसुमनांनी अभिनंदन करून गुलाबपुष्प देत त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. कानळदा गावाचे सरपंच पुंडलिक तुळशीराम सपकाळे यांनी कुंभार समाज बांधवांच्या या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या मते, यंदाच्या यात्रेतून गावात एक नवा, सकारात्मक आणि अनुकरणीय पायंडा निर्माण झाला असून, भविष्यातील विविध उत्सव आणि सामाजिक उपक्रमांसाठी तो निश्चितच प्रेरणादायी ठरेल.

# श्री. पुंडलिक सपकाळे यांच्या पुढाकाराने ईद-ए-मिलाद निमित्त मुस्लिम बांधवांच्या घरी सदिच्छा भेट

## प्रशासक पुंडलिक सपकाळे यांच्या पुढाकाराने उपक्रम

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी :** ईद-ए-मिलाद-उन-नबीच्या पवित्र पर्वानिमित्त कानळदा गावात हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि सामाजिक सलोख्याचा सुंदर संदेश देणारा उपक्रम उत्साहात पार पडला. सरपंच तथा प्रशासक पुंडलिक सपकाळे यांच्या पुढाकाराने गावातील मुस्लिम बांधवांच्या घरी सदिच्छा भेट देऊन त्यांना ईदच्या मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. या उपक्रमांतर्गत गावातील मुस्लिम बांधवांच्या घरी प्रत्यक्ष भेट देत ईद-ए-मिलादच्या शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शुभेच्छा स्वीकारताना मुस्लिम बांधवांच्या चेहऱ्यावर आनंद, समाधान आणि आपलेपणाची भावना दिसून आली. या सदिच्छा भेटींमुळे परस्परांतील प्रेम, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा अधिक दृढ झाला. ही केवळ सणाच्या शुभेच्छांची भेट न राहता माणुसकीच्या नात्याला अधिक घट्ट करणारा आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याची भावना जपणारा विधायक उपक्रम ठरला. गावातील विविध समाजघटकांनी



एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होत सामाजिक एकतेची परंपरा अधिक मजबूत करण्याचा संदेश यानिमित्ताने दिला. ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग या उपक्रमात ग्रामपंचायत सदस्य निवृत्ती बोरोले, जगदीश सपकाळे, किशोर सपकाळे तसेच जितेंद्र सपकाळे, प्रल्हाद न्हावकर, तुषार विसपुते सहभागी झाले होते. ग्रामपंचायत कर्मचारी कांतीलाल सपकाळे, योगेश भंगाळे आणि नामदेव धनगर यांनीही या उपक्रमात सहभाग नोंदविला. गावातील सामाजिक एकता आणि परस्पर सौहार्द वृद्धिंगत करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. 'धर्म वेगळे असले तरी माणुसकी एकच, सण वेगळे असले तरी आनंद एकच आणि गाव म्हणजे प्रेम, एकता व बंधुभावाने जोडलेले एक कुटुंब', हा संदेश या उपक्रमातून अधोरेखित झाला. सर्व मुस्लिम बांधवांना ईद-ए-मिलाद-उन-नबीच्या मनःपूर्वक शुभेच्छा देत सामाजिक सलोखा आणि बंधुभावाची ही भावना सदैव कायम राहावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. ईद-ए-मिलाद-उन-नबीच्या पवित्र पर्वानिमित्त कानळदा गावात हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि सामाजिक सलोख्याचा सुंदर संदेश देणारा उपक्रम उत्साहात पार पडला. सरपंच तथा प्रशासक पुंडलिक सपकाळे यांच्या पुढाकाराने गावातील मुस्लिम बांधवांच्या घरी सदिच्छा भेट देऊन त्यांना ईदच्या मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

# कुंभमेळ्याच्या खर्चावर इम्तियाज जलील यांचा आक्षेप!

जन सम्राट टाईम्स

**नाशिक। प्रतिनिधी:** नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याची तयारी जोरात सुरू असतानाच, कुंभमेळ्यासाठी होणाऱ्या मोठ्या आर्थिक खर्चावरून राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. या खर्चाच्या प्राधान्यक्रमावर एमआयएमचे नेते आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकमध्ये रस्ते, पूल, वाहतूक व्यवस्था, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि इतर पायाभूत सुविधांच्या विकासकामांना मोठ्या प्रमाणात गती देण्यात आली आहे. मात्र, एवढ्या मोठ्या निधीचा वापर शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी अधिक प्रभावीपणे करता आला असता, अशी भूमिका जलील यांनी मांडली आहे. 'या पैशांतून किती शाळा किंवा IIT उभारता आल्या असत्या?' कुंभमेळ्यासाठी ३० हजार कोटी रुपये खर्च करण्याच्या चर्चेवर प्रतिक्रिया देताना इम्तियाज जलील यांनी सरकारच्या खर्चाच्या प्राधान्यक्रमावर सवाल उपस्थित केला. "कुंभमेळ्यावर ३० हजार कोटी रुपये खर्च होतात; या पैशांतून किती शाळा किंवा IIT उभारता आल्या असत्या?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. नागरिकांना चांगल्या शाळा, दर्जेदार शिक्षण आणि आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे ही सरकारची प्राथमिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी म्हटले. त्यामुळे कुंभमेळ्यासाठी होणाऱ्या मोठ्या खर्चाच्या तुलनेत शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील गरजांकडेही तितक्याच गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता असल्याचा मुद्दा त्यांनी मांडला. कुंभमेळ्यामुळे नाशिकच्या विकासकामांना वेग दरम्यान, आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहर आणि परिसरातील पायाभूत सुविधांच्या विकासाला मोठी चालना मिळत आहे. शहरातील रस्ते, वाहतूक व्यवस्था, पाणीपुरवठा, स्वच्छता तसेच भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक असलेल्या विविध सुविधा उभारण्याची कामे प्रशासनाकडून हाती घेण्यात आली आहेत.

# मुंढेंच्या रडारवर अंगणवाड्या, थेट आदेशाने टेन्शन वाढलं!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई| प्रतिनिधी:** अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या रडारवर आता राज्यातील अंगणवाड्या आल्या आहेत. त्या एका आदेशाने अनेकांची धाकधुक वाढली आहे. या गोष्टींची आता तपासणी होणार आहे. सणासुदीच्या काळात अन्न सुरक्षिततेसाठी FDAची विशेष तयारी,पुढील एक-दोन दिवसांत सणासुदीच्या काळासाठी विशेष आदेश जारी होणार आहे. तुकाराम मुंढेंच्या रडारवर राज्यातील अंगणवाड्या, थेट आदेशाने टेन्शन वाढलं; या गोष्टींची तपासणी होणार! आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची धडाकेबाज मोहीम सुरूच आहे. आता अंगणवाड्या त्यांच्या रडारवर आल्या आहेत.

अन्न आणि औषध प्रशासनाने राज्यातील अंगणवाड्यांमधील पोषण आहार, शालेय पोषण आहार, मिड-डे मिलकडे मोर्चा वळवला आहे. महाराष्ट्रभर अंगणवाडी आणि शालेय आहार व्यवस्थेच्या तपासणीचे आदेश देण्यात आले आहेत. अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांना निकृष्टदर्जाचे जेवण देण्यात येत असल्याचे समोर आले होते. भूंगे लागलेले कडधान्य, खिचडीत आळ्या आणि अस्वच्छतेच्या घटना समोर आल्या होत्या. या नवीन आदेशामुळे शालेय पोषण आहारात मापात पाप करणाऱ्यांचे धाबे दणाणार आहे. आम्ही कोणालाही सोडत नाही एका मुलाखतीदरम्यान आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सध्याच्या कारवाईबाबत जी टीका होते त्याला



उत्तर दिले आहे. आम्ही कोणालाही सोडत नाही. FDAकडून निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने कारवाईचा दावा त्यांनी केला.

जवळपास दररोज तपासणी आणि कारवाईची माहिती माध्यमांना दिली जाते. कारवाईसोबत फोटो आणि व्हिडिओही प्रसिद्ध केले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. निष्पक्ष आणि पारदर्शक कारवाई सुरूच राहणार असल्याचे ते म्हणाले. सरकारी असो किंवा खासगी, FDAच्या कारवाईत कोणताही भेदभाव करण्यात येत नसल्याचे मुंढेंनी स्पष्ट केले. मंत्रालयातील कॅन्टीनचीही FDAकडून तपासणी करण्यात आले. यापूर्वी आमदार निवासातील कॅन्टीनचीही तपासणी केल्याचं मुंढे यांनी सांगितलं. सरकारी आणि निमसरकारी मिळून ११५ हून अधिक ठिकाणी तपासणी करण्यात आली. तपासणीत नियमभंग आढळलेल्या आस्थापनांवर सुधारणा नोटीस आणि निलंबनाची कारवाई करण्यात आली. काही सरकारी-निमसरकारी आस्थापनांचे परवानेही निलंबित केल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. शालेय पोषण आहार रडारवर आमच्या दृष्टीने सरकारी किंवा खासगी अशी वेगळी कॅटेगरी नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. FBO म्हणजे Food Business Operator असे आहे.

# मध्य रेल्वेवर 15 दिवसांचा विशेष ब्लॉक!

## २८ ऑगस्टच्या मध्यरात्रीपासून ११ सप्टेंबरपर्यंत विशेष ट्रॅफिक व पॉवर ब्लॉक

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** मध्य रेल्वे मार्गावरील टिटवाळा स्थानकात १५ डब्यांच्या गाड्यांसाठी फलाटाचा विस्तार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामासाठी २८ ऑगस्ट २०२६ च्या मध्यरात्रीपासून ११ सप्टेंबर २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत तब्बल १५ दिवसांचा विशेष ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. या ब्लॉकचा परिणाम उपनगरीय तसेच लांब पल्ल्याच्या रेल्वे वाहतुकीवर होणार असून प्रवाशांना काही प्रमाणात गैरसोयीला सामोरे जावे लागणार आहे. कल्याण आणि वासिंद स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन मार्गावर रात्री ११.३० ते पहाटे ५.१० वाजेपर्यंत हा विशेष ब्लॉक घेण्यात येणार आहे. टिटवाळा स्थानकातील फलाटाचा विस्तार तसेच संबंधित पायाभूत कामे या कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत. काही गाड्या शॉर्ट टर्मिनेट; काहींचे नियमन विशेष ब्लॉकमुळे काही लांब पल्ल्याच्या आणि उपनगरीय गाड्यांच्या वेळापत्रकावर परिणाम होणार आहे. काही गाड्या निर्धारित स्थानकाऐवजी त्यापूर्वीच शॉर्ट टर्मिनेट करण्यात येतील, तर काही गाड्या विलंबाने धावण्याची



शक्यता आहे. त्यामुळे प्रवाशांनी प्रवासाचे नियोजन करताना रेल्वे प्रशासनाच्या अद्ययावत वेळापत्रकाची माहिती घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गाडी क्रमांक 11048 गोरखपूर–दादर एक्सप्रेसचे २८ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी वासिंद येथे, तर ३० आणि ३१ ऑगस्ट रोजी आटगाव येथे नियमन करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे गाडी क्रमांक 11044 बलिया–दादर एक्सप्रेसचे २९ आणि ३० ऑगस्ट रोजी आटगाव येथे, तर ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी वासिंद येथे नियमन करण्यात येईल. लांब पल्ल्याच्या गाड्यांनाही विलंब ब्लॉकच्या कालावधीत काही मेल आणि एक्स्प्रेस गाड्या १० ते २० मिनिटे उशिराने गंतव्यस्थानी पोहोचण्याची शक्यता आहे. यामध्ये गाडी क्रमांक 12102 शालीमार–लोकमान्य टिळक टर्मिनस ज्ञानेश्वरी एक्सप्रेस, 18030 शालीमार–लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेस, 12810 हावडा–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मेल आणि 15181 मऊ–लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेस यांचा समावेश आहे. याशिवाय विलंबाने धावणाऱ्या मेल/एक्स्प्रेस गाड्या तसेच सुट्टीकालीन विशेष गाड्यांचे मार्ग बदलले जाऊ शकतात. परिचालनाची आवश्यकता लक्षात घेऊन काही गाड्यांचे नियमनही करण्यात येण्याची शक्यता रेल्वे प्रशासनाने व्यक्त केली आहे. शुक्रवारी रात्री टिटवाळा-कसारा लोकल सेवा प्रभावित ब्लॉकच्या कालावधीत शुक्रवारी रात्री टिटवाळा आणि कसारा स्थानकांदरम्यान उपनगरीय सेवा उपलब्ध राहणार नाही, त्यामुळे या मार्गावरील प्रवाशांना पर्यायी प्रवासाचे नियोजन करावे लागणार आहे. टिटवाळा स्थानकातील फलाट विस्ताराचे काम पूर्ण झाल्यानंतर १५ डब्यांच्या गाड्यांच्या परिचालनासाठी अधिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. मात्र, कामाच्या कालावधीत रेल्वे वाहतुकीवर होणारा परिणाम लक्षात घेता प्रवाशांनी अतिरिक्त वेळ राखून प्रवास करावा.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# कानबाई माता विसर्जन सोहळ्यात सौ. ममता पाटील यांचा उत्स्फूर्त सहभाग

## डोक्यावर कानबाई मातेची मूर्ती घेत पारंपरिक फुगड्यांत सहभाग; शेतकरी सुख-समृद्धीसाठी प्रार्थना

जन सम्राट टाईम्स

**पाळधी । प्रतिनिधी:** खानदेशच्या लोकसंस्कृतीचे आणि पारंपरिक श्रद्धेचे प्रतीक असलेल्या कानबाई माता उत्सवाला पाळधी येथे उत्साहाचे स्वरूप प्राप्त झाले. विविध कानबाई माता मंडळांच्या विसर्जन सोहळ्यात माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांच्या पत्नी सौ. ममता प्रतापराव पाटील यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. डोक्यावर कानबाई मातेची मूर्ती घेत त्यांनी विसर्जन मिरवणुकीत सहभाग नोंदविला.

यावेळी महिलांसोबत पारंपरिक फुगडी खेळत त्यांनी उत्सवाचा आनंदही घेतला. कानबाई मातेचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी शेतकरी बांधवांना सुख-समृद्धी लाभावी, भरघोस पीक यावे तसेच सर्वांचे आरोग्य व कल्याण व्हावे, यासाठी प्रार्थना केली. त्यांच्या या उत्स्फूर्त सहभागामुळे महिला वर्गात विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

पाटील कुटुंबीयांचा उत्सवात सहभाग नामदार गुलाबराव पाटील हे मुंबईतील कामकाजामुळे मुंबईत असल्याने, तर माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील हे मतदारसंघातील विविध कामांमध्ये व्यस्त असल्याने त्यांच्या कुटुंबातील महिलांनी पाळधीतील कानबाई माता उत्सवात सहभाग घेतला. गुलाबराव पाटील यांच्या कुटुंबातील दोन्ही सुनांनी गावातील विविध कानबाई माता मंडळांना भेटी देऊन मातेचे दर्शन घेतले. सौ. ममता पाटील यांनी महिला व ग्रामस्थांमध्ये सहजपणे मिसळून संवाद साधला. पारंपरिक



उत्सवात सर्वसामान्य महिलांप्रमाणे सहभागी होत त्यांनी आपुलकीचा परिचय दिला. जीपीएस महिला मित्र परिवार सामाजिक कार्यासाठी सज्ज जीपीएस मित्र परिवाराच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच धर्तीवर जीपीएस महिला मित्र परिवाराची स्वतंत्र व भक्कम वाटचाल सुरू करण्याचा निर्धार सौ. ममता पाटील यांनी व्यक्त केला. "जीपीएस मित्र परिवार ज्या पद्धतीने समाजाच्या सुख-दुःखात धावून जात विविध सामाजिक उपक्रम राबवित आहे, त्याचप्रमाणे जीपीएस महिला मित्र परिवारातील महिलाही खांद्याला खांदा लावून सामाजिक कार्य करण्यासाठी सज्ज आहेत," असा संदेश त्यांनी यावेळी दिला. महिलांना केवळ उत्सव व सांस्कृतिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न ठेवता आरोग्य, महिला सक्षमीकरण, गरजू कुटुंबांना मदत आणि विविध समाजोपयोगी उपक्रमांत सक्रिय सहभागी करून घेण्याचा मानस असल्याचे यानिमित्ताने स्पष्ट झाले. साधेपणातून आपुलकीचा संदेश नामदारांची सून किंवा माजी जिल्हा परिषद सदस्यांची पत्नी अशी कौटुंबिक ओळख असतानाही सौ. ममता पाटील यांचा साधेपणा आणि सर्वसामान्यांमध्ये मिसळण्याचा स्वभाव कानबाई माता उत्सवाच्या निमित्ताने प्रकर्षाने जाणवला. महिलांसोबत फुगडी खेळणे, विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणे आणि ग्रामस्थांशी मनमोकळा संवाद साधणे यामुळे उपस्थित महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कानबाई माता उत्सवाच्या माध्यमातून धार्मिक श्रद्धेसोबत खानदेशी संस्कृती, महिला एकजूट आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. जीपीएस मित्र परिवाराच्या सामाजिक कार्याला आता महिला शक्तीची साथ मिळणार असून, महिला सहभागातून आगामी काळात विविध समाजोपयोगी उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# लाडकुबाई प्राथमिक विद्यामंदिरात राखी बनवा कार्यशाळा उत्साहात!



जन सम्राट टाईम्स

**भडगाव । प्रतिनिधी :** कर्मवीर तात्यासाहेब हरी रावजी पाटील किसान शिक्षण संस्था संचलित लाडकुबाई प्राथमिक विद्यामंदिर, भडगाव येथे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी 'राखी बनवा कार्यशाळेचे' आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध रंगांच्या आकर्षक राख्या तयार केल्या. शाळेचे मुख्याध्यापक श्री. कमलेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा सुंदर आविष्कार घडवत रंगीबेरंगी, आकर्षक व कलात्मक राख्या तयार केल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, कलाकौशल्य, आत्मविश्वास तसेच बहीण-भावाच्या प्रेमाचे व बंधुभावाचे महत्त्व रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यशाळेत उत्कृष्ट राखी तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांमधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. विजेत्या विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षिसे व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. बक्षीस वितरणामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून आला. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम शाळेच्या उपक्रमशीलतेचे व विद्यार्थीकेंद्रित शिक्षणाचे उत्तम उदाहरण ठरला.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स ब्रेक न्यूज ज

# प्रजा सुराज्य पक्षाची निर्णायक बैठक आज

## १७ सप्टेंबरच्या शिव-भीम पदयात्रेच्या



जन सम्राट टाईम्स

**सोयगाव । प्रतिनिधी :** सोयगाव : शालेय पोषण आहार कामगारांच्या विविध प्रश्नांसह प्रधानमंत्री आवास योजनेतील सर्वांसाठी घरे (AHP घटक) योजनेअंतर्गत घरापासून वंचित असलेल्या बेघर नागरिकांच्या प्रश्नावर प्रजा सुराज्य पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे. या प्रश्नांकडे सोयगाव नगरपंचायतीचे प्रशासन गांभीर्याने लक्ष देत नसल्याचा आरोप करत पक्षाने १७ सप्टेंबर २०२६ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त 'शिव-भीम पदयात्रा' आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनाची पुढील दिशा, नियोजन आणि उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी गुरुवार, २७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, सोयगाव येथे निर्णायक बैठक आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीस पक्षाच्या सोयगाव तालुक्यातील सर्व पदाधिकारी व सदस्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सोयगाव नगरपंचायत हद्दीतील ३४२ बेघर नागरिकांना हक्काचे घर मिळावे, यासाठी प्रजा सुराज्य पक्ष गेल्या आठ वर्षांपासून संघर्ष करत असल्याचे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र, या मागणीची स्थानिक प्रशासनाने अपेक्षित दखल घेतली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. AHP घटक योजनेअंतर्गत पात्र नागरिकांना घरकुलाचा लाभ मिळावा, यासाठी ठोस कार्यवाही करण्याची मागणी पक्षाने केली आहे. शालेय पोषण आहार कामगारांच्या प्रश्नांकडेही प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन त्यांच्या मागण्या मार्गी लावाव्यात, अशी भूमिका पक्षाने घेतली आहे. दोन्ही प्रश्नांवर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आगामी शिव-भीम पदयात्रा आंदोलन निर्णायक ठरणार असल्याचे पक्षाच्या वतीने सांगण्यात आले.

अध्यक्ष शरद गोटे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक दरम्यान, २६ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हा परिषद शाळा, सोयगाव येथे प्रजा सुराज्य पक्षाचे अध्यक्ष शरद गोटे यांच्या अध्यक्षतेखाली विविध विषयांवर बैठक घेण्यात आली. या बैठकीत आगामी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक तयारी, नागरिकांचे प्रश्न आणि आंदोलनाचे नियोजन याबाबत चर्चा करण्यात आली. आगामी बैठकीस सोयगाव तालुक्यातील पक्षाचे पदाधिकारी, सदस्य आणि संबंधित कार्यकर्त्यांनी वेळेत उपस्थित राहून आपली भूमिका मांडावी, असे आवाहन अध्यक्ष शरद गोटे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# MPSC चा धक्कादायक कारभार; औषध निरीक्षक पदाची परीक्षा रद्द

## विद्यार्थ्यांचा विश्वासही डळमळला

जन सम्राट टाईम्स

**नागपूर । प्रतिनिधी:** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) औषध निरीक्षक (Drug Inspector) पदाच्या परीक्षेबाबत पेपरफुटीचा प्रकार समोर आल्याने स्पर्धा परीक्षा क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. परीक्षा सुरू होण्यापूर्वीच प्रश्नपत्रिका फुटल्याचा आरोप झाल्यानंतर आयोगाने परीक्षा रद्द करून फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. फेरपरीक्षेसाठी उमेदवारांकडून पुन्हा परीक्षा शुल्क आकारले जाणार नसल्याचे आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, या प्रकारामुळे परीक्षा व्यवस्थेच्या गोपनीयतेवर आणि सुरक्षिततेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. शुल्कमाफी पुरेशी आहे का? परीक्षा रद्द झाल्यानंतर विद्यार्थ्यांना पुन्हा शुल्क भरावे लागणार नसल्याने काही प्रमाणात दिलासा मिळाला असला तरी, विद्यार्थ्यांच्या



अडचणी केवळ शुल्कापुरत्या मर्यादित नसल्याचे स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांचे म्हणणे आहे. दिवस-रात्र अभ्यास करून परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा वेळ, मानसिक ताण तसेच प्रवास आणि राहण्याचा खर्च याचे काय, असा सवाल उपस्थित केला जात आहे. विशेषतः नागपूर, छत्रपती संभाजीनगर, पुणे-मुंबईसह विविध शहरांत राहून तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना फेरपरीक्षेमुळे पुन्हा आर्थिक व मानसिक भार सहन करावा लागणार आहे. 'आता आयोगावर विश्वास कसा ठेवायचा?' पेपरफुटीच्यामनात परीक्षा व्यवस्थेबाबत अविश्वास निर्माण झाला आहे. "आम्ही प्रामाणिकपणे अभ्यास करायचा आणि परीक्षा व्यवस्थेतील गैरप्रकारांमुळे पुन्हा परीक्षा द्यायची, तर आमच्या कष्टाचे काय?" असा सवाल विद्यार्थी उपस्थित करत आहेत. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा म्हणजे मोठ्या संघर्षाचा प्रवास असतो. त्यामुळे वारंवार परीक्षा रद्द होणे किंवा गैरप्रकारांच्या घटना समोर येणे याचा थेट परिणाम त्यांच्या मानसिक आणि आर्थिक स्थितीवर होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. कठोर कायद्याची प्रभावी अंमलबजावणीची मागणी स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी राज्यात महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) कायदा, २०२४ करण्यात आला आहे. या कायद्यात परीक्षेतील गैरप्रकारांसाठी कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेतील पेपरफुटीच्या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी.

# साळी समाजातर्फे भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव उत्साहात!

## तरसोद येथे वृक्षारोपण व फलकाचे अनावरण

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । (प्रतिनिधी):** साळी समाजाचे आद्यदैवत भगवान श्री जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव साळी समाजाच्या वतीने भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी सहा वाजता भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवाच्या कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी रामदास डहाके यांनी पोथी वाचन केले, तर साळी माता महिला मंडळाच्या वतीने स्वागतगीत सादर करण्यात आले. याप्रसंगी भगवान श्री जिव्हेश्वर युवक मंडळाने तरसोद येथे नव्याने घेतलेल्या जागेवर वृक्षारोपण करण्यात आले. तसेच जागेवरील फलकाचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद सदस्य प्रताप गुलाबराव पाटील, लॅन्ड डेव्हलपर यशवंत बारी, एरंडोल साळी महासभेचे अध्यक्ष सोमनाथ कासटकर, महावितरण जळगाव



शहर व ग्रामीणचे अभियंता दत्तात्रय साळी, भगवान श्री जिव्हेश्वर युवक मंडळाचे अध्यक्ष राजू खेडकर, उपाध्यक्ष सुधीर खंडारे, सचिव किशोर खंडारे, सहसचिव पद्माकर आखडकर, कोषाध्यक्ष गणेश भोगरे यांच्यासह सुभाष धमके, संजय चिंचकर, प्रदीप साळी तसेच समाजबांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा, पदोन्नती प्राप्त समाजबांधवांचा तसेच समाजाच्या विविध उपक्रमांसाठी आर्थिक योगदान देणाऱ्या समाजबांधवांचा सन्मान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. या सत्कार सोहळ्यामुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपाली खंडारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नेहा खंडारे, दिनेश साळी, दत्तात्रय भोगरे, मनीष वाझट, प्रशांत खंडारे, प्रमोद भोगरे आदींनी विशेष परिश्रम घेतले. साळी समाजाचे आद्यदैवत भगवान श्री जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव साळी समाजाच्या वतीने भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी सहा वाजता भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवाच्या कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी रामदास डहाके यांनी पोथी वाचन केले, तर साळी माता महिला मंडळाच्या वतीने स्वागतगीत सादर करण्यात आले. याप्रसंगी भगवान श्री जिव्हेश्वर युवक मंडळाने तरसोद येथे नव्याने घेतलेल्या जागेवर वृक्षारोपण करण्यात आले. तसेच जागेवरील फलकाचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

# जिल्हा बँक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विकासोतील वातावरण तप्त!

जन सम्राट टाईम्स

**भडगाव । प्रतिनिधी:** जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचे वारे वाहू लागल्याने जिल्ह्यातील विविध कार्यकारी सहकारी संस्थांमध्ये मतदानाच्या अधिकारासाठी ठराव करण्यावरून राजकीय हालचालींना वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर पळासखेडे रुपनगर विविध कार्यकारी सहकारी सोसायटीमध्ये गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या रस्सीखेचीनंतर अखेर आज कडक पोलीस बंदोबस्तात ठराव करण्यात आला. वादळी चर्चेनंतर झालेल्या सभेत १३ विरुद्ध ७ मतांनी नियमित कर्जफेड करणारे सभासद प्रेमराज सूर्यभान पवार यांच्या नावाचा मतदानाच्या अधिकारासाठी ठराव मंजूर करण्यात आला. ठरावाच्या वेळी सभासदांमध्ये जोरदार चर्चा झाल्याने काही काळ वातावरण तणावपूर्ण झाले होते. जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक जाहीर झाल्यापासून विविध कार्यकारी सोसायट्यांकडून मतदानाचा अधिकार मिळविण्यासाठी संबंधित



सभासदाच्या नावाचा ठराव करण्यासाठी रस्सीखेच सुरू आहे. पळासखेडे रुपनगर येथेही याचे पडसाद उमटले. सोसायटीतील काही सदस्य सहलीला गेल्याने गावातील वातावरण अधिकच तप्त झाले होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी भडगाव पोलिसांकडून सभेच्या ठिकाणी कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. ठराव कशासाठी? पळासखेडे रुपनगर विविध कार्यकारी सहकारी सोसायटीची कर्जवसुली १०० टक्के नसल्यामुळे निवडून आलेल्या सभासदांना जिल्हा बँक निवडणुकीत मतदानासाठी त्यांच्या नावाचा ठराव करण्याचा अधिकार काढून घेण्यात आला आहे. त्यामुळे नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या सभासदाच्या नावाचा ठराव करून त्यांना मतदानाचा अधिकार मिळवून देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. यामुळेच संबंधित सोसायटीमध्ये ठरावावरून गेल्या काही दिवसांपासून जोरदार रस्सीखेच सुरू होती. सभेला सोसायटीचे चेअरमन प्रमोद कृष्णा पाटील, संचालक शरद पाटील, ज्ञानेश्वर राजपूत, ताराचंद पवार, पांडुरंग जाधव, धनंजय पवार, संगीताबाई पाटील, सखुबाई पाटील, दीपक मोरे, राहुल पाटील, हरी वंजारी यांच्यासह सभासद उपस्थित होते. सचिवांनी बजावली निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची भूमिका सभेच्या वेळी संस्थेचे सचिव संतोष चंदले यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. त्यांना संस्थेचे शिपाई लक्ष्मण पाटील यांनी सहकार्य केले.

# जिल्हा परिषद आणि पंचायत समितीतही आता स्वीकृत सदस्यांची नियुक्ती

## प्राध्यापक आणि समाजसेवकांना संधी, राजकीय कार्यकर्त्यांमध्ये इच्छुकांची लगबग

जन सम्राट टाईम्स

**मुंबई । प्रतिनिधी:** जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या राजकारणात आता मोठी घडामोड घडणार आहे. महापालिका आणि नगरपालिकांच्या धर्तीवर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत आणि नामनिर्देशित सदस्य नियुक्त करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ग्रामविकास विभागाने यासंदर्भातील अधिसूचना जारी केल्याने राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रतिनिधित्वाची नवी संधी उपलब्ध झाली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक २०२६ यापूर्वीच विधानसभेत मंजूर झाले आहे. त्यानंतर आता या तरतुदींच्या अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये एकूण १ हजार ५ नवीन स्वीकृत व नामनिर्देशित सदस्यांची भर पडणार आहे. जिल्हा परिषदेत १० टक्के, पंचायत समितीत २० टक्के सदस्य नवीन तरतुदीनुसार जिल्हा परिषदेत एकूण निर्वाचित सदस्यसंख्येच्या १० टक्के किंवा किमान पाच सदस्य, यापैकी नियमानुसार स्वीकृत सदस्य नियुक्त केले जाणार आहेत. पंचायत समितीमध्ये एकूण सदस्यसंख्येच्या २० टक्के किंवा किमान एक सदस्य नियुक्त करण्याची तरतूद करण्यात आली आहे. या नियुक्त्यांमध्ये केवळ




राजकीय कार्यकर्त्यांनाच नव्हे, तर संबंधित क्षेत्रातील वकील, शिक्षक, प्राध्यापक, समाजसेवक तसेच तज्ज्ञ व्यक्तींनाही संधी मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात सहभागी होण्याचा मार्ग खुला झाला आहे. पक्षांच्या संख्याबळानुसार होणार नामनिर्देशन स्वीकृत सदस्यांच्या नामनिर्देशनासाठी जिल्हाधिकारी मान्यताप्राप्त तसेच नोंदणीकृत पक्ष आणि गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेणार आहेत. संबंधित पक्ष किंवा गटाच्या नेत्याशी विचारविनिमय करून त्यांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन केले जाणार आहे. यासाठी संबंधित पक्ष आणि गटांना जिल्हाधिकाऱ्यांकडे गटनोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. अधिसूचना जारी झाल्यानंतर आता राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषद आणि पंचायत समिती स्तरावर या प्रक्रियेला वेग येण्याची शक्यता आहे. ३४ जिल्हा परिषदांमध्ये २०१ स्वीकृत सदस्य राज्यातील ३४ जिल्हा परिषदांमध्ये सध्या २ हजार २१० निर्वाचित सदस्य आहेत. त्यांच्या जोडीला आता २०१ स्वीकृत सदस्यांची भर पडणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषदांच्या कामकाजात विविध क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींना सहभागी करून घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्याचप्रमाणे राज्यातील ३०१ पंचायत समित्यांमधील ४ हजार २४ निर्वाचित सदस्यांमध्ये आणखी ८०४ नामनिर्देशित सदस्यांची भर पडणार आहे. परिणामी ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रतिनिधित्वाचा विस्तार होणार आहे. तज्ज्ञांच्या अनुभवाचा प्रशासनाला फायदा स्वीकृत आणि नामनिर्देशित सदस्यांना जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रशासकीय कामकाजात सल्ला आणि तांत्रिक मार्गदर्शन करता येणार आहे. त्यामुळे शिक्षण, कायदा, समाजकार्य, प्रशासन आणि अन्य क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींच्या ज्ञानाचा ग्रामीण विकासाच्या कामात उपयोग होण्याची अपेक्षा आहे.

# येथील शहादा तालुक्यात 'शेतकरी मित्र' पदासाठी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज मागणी

जन सम्राट टाईम्स

**शहादा । प्रतिनिधी:** शहादा तालुक्यातील ४८ सहाय्यक कृषी अधिकारी सजा कार्यक्षेत्रांसाठी 'शेतकरी मित्र' पदाची निवड प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. दोन वर्षांच्या कालावधीसाठी दरमहा १ हजार ५०० रुपये मानधनावर ही निवड होणार असून,इच्छुक उमेदवारांना ३१ ऑगस्टपर्यंत संबंधित ग्राम विकास समितीकडे अर्ज करता येणार आहे. या ४८ पदांपैकी ३० टक्के म्हणजेच १४ सजा क्षेत्रे महिलांसाठी राखीव करण्यात आली आहेत. सोमवारी शहादा तालुका कृषी अधिकारी कार्यालयात कृषी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पारदर्शक पद्धतीने आरक्षण सोडत काढण्यात आली. यामध्ये,मोहिदे त.श.,डामरखेडा, धुरखेडा, पाडळदा, मलगाव, डोंगरगाव,कवळीथ,दामळदा,ससदे, बिलाडी त.सा.,वडाळी,म्हसावद,रामपुर व बहिरपुर या गावांचा समावेश आहे. या सजा क्षेत्रांसाठी पुरुष उमेदवारांचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. 'शेतकरी मित्र' म्हणून गावात महिला व पुरुष शेतकरी गट तयार करणे, नैसर्गिक शेतीचा प्रचार करणे, ग्रामसभेत कृषी विभागाच्या योजनांची माहिती देणे तसेच तालुकास्तरीय प्रशिक्षणास उपस्थित राहणे ही प्रमुख कामे असतील. अधिक शिक्षण असलेल्या उमेदवारांना प्राधान्य: उमेदवारासाठी वयोमर्यादा २५ ते ६० वर्षे आहे. तो सजा क्षेत्रातील रहिवासी व सक्रिय शेतकरी असणे आवश्यक आहे.किमान बारावी उत्तीर्ण असावो. अधिक शिक्षण असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार असून,मोबाईल ॲप व सोशल मीडियाचे ज्ञान असणे आवश्यक आहे.उमेदवारावर कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नसावा. अर्जाचा विहित नमुना व अधिक माहितीसाठी इच्छुकांनी संबंधित सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

# जिल्हा परिषदेच्या शाळेतून थेट राज्य विक्रीकर अधिकारी पदापर्यंत!

## शुभम जंगम यांची थक्क करणारी यशोगाथा

जन सम्राट टाईम्स

**माणगाव | प्रतिनिधी :** माणगाव तालुक्यातील खरवली या ग्रामीण भागातून महाराष्ट्राला प्रेरणादायी यशकथा मिळाली आहे. खरवलीचे सुपुत्र शुभम महेंद्र जंगम यांनी जिद्द, चिकाटी आणि तब्बल पाच वर्षांच्या अथक परिश्रमाच्या बळावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे जंगम कुटुंबासह खरवली गाव आणि संपूर्ण माणगाव तालुक्याचा नावलौकिक वाढला आहे. MPSC राज्यसेवा परीक्षेत राज्यात द्वितीय क्रमांक सन २०२३ मध्ये झालेल्या MPSC राज्यसेवा परीक्षेत शुभम जंगम यांनी ओबीसी प्रवर्गातून संपूर्ण महाराष्ट्रात द्वितीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. या यशाच्या जोरावर त्यांची GST विभागात सहाय्यक राज्य कर निरीक्षक (Assistant State Tax Inspector) या प्रतिष्ठित पदावर नियुक्ती झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्यांचे हे यश विशेष प्रेरणादायी ठरले आहे.जिल्हा परिषदेच्या शाळेपासून अभियांत्रिकीपर्यंतचा प्रवास शुभम यांचा शैक्षणिक प्रवास ग्रामीण परिस्थितीतून मोठे यश मिळविण्याचे उत्तम उदाहरण आहे. इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतचे शिक्षण त्यांनी प्राथमिक शाळा, खरवली येथे पूर्ण केले. त्यानंतर पाचवी ते नववीपर्यंतचे शिक्षण नूतन



माध्यमिक विद्यालय, खरवली येथे झाले. नववी ते बारावीपर्यंतचे शिक्षण अशोक दादा साबळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, माणगाव येथे पूर्ण केल्यानंतर त्यांनी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेतून अभियांत्रिकीची पदवी संपादन केली. इंजिनिअरिंगनंतर तब्बल पाच वर्षे सातत्यपूर्ण, नियोजनबद्ध आणि खडतर अभ्यास करून त्यांनी MPSC मध्ये हे यश संपादन केले. कौटुंबिक संस्कार आणि शिक्षकांचे मार्गदर्शन ठरले आधार शुभम यांच्या यशामागे त्यांच्या कुटुंबीयांचे संस्कार आणि शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. त्यांचे वडील महेंद्र जंगम हे नूतन माध्यमिक विद्यालय, खरवली येथे शिक्षक म्हणून कार्यरत असून, आई माधुरी जंगम या गृहिणी आहेत. शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या वातावरणात ढळलेल्या शुभम यांच्यात लहानपणापासूनच अभ्यासाची गोडी निर्माण झाली. समोर ठेवलेले ध्येय पूर्ण होईपर्यंत माघार न घेण्याची वृत्ती त्यांच्या यशात निर्णायक ठरली. या प्रवासात शिक्षकांचे मार्गदर्शन, कुटुंबीयांचा अढळ विश्वास आणि मित्रपरिवाराचे प्रोत्साहन हे तीन आधारस्तंभ ठरल्याचे शुभम यांनी सांगितले. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभ मोठ्या शहरांतील क्लासेस आणि अत्याधुनिक सुविधांपासून दूर राहूनही स्व-अभ्यास, नियोजन आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवता येते, हे शुभम जंगम यांनी सिद्ध करून दाखविले आहे. त्यांची यशोगाथा माणगाव तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक आणि प्रेरणादायी दीपस्तंभ ठरणार आहे. खरवलीत भव्य मिरवणूक व सत्कार सोहळा शुभम जंगम यांच्या या उल्लेखनीय यशाचा गौरव करण्यासाठी खरवली ग्रामस्थांच्या वतीने मंगळवार, २५ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता भव्य मिरवणूक व सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. खरवली गावातून खरवली हायस्कूलपर्यंत मिरवणूक काढून शुभम यांचा गौरव करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या शाळेपासून सुरू झालेला प्रवास राज्यसेवा परीक्षेतील यशापर्यंत पोहोचविणाऱ्या शुभम जंगम यांच्या जिद्दीने 'परिस्थिती कोणतीही असो, ध्येय मोठे असेल तर यश निश्चित मिळवता येते' हा संदेश ग्रामीण विद्यार्थ्यांसमोर ठेवला आहे.

# लोहारा येथे कायदेविषयक जनजागृती शिबिर उत्साहात संपन्न

## ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधत महत्त्वपूर्ण विषयांवर विधी किशोर डोंगरे यांचे मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स

**लोहारा, ता. पाचोरा। प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील नागरिकांना कायदेविषयक माहिती मिळावी, त्यांच्या मूलभूत व संविधानिक हक्कांची जाणीव व्हावी तसेच गरजू नागरिकांना उपलब्ध असलेल्या विधी सेवा आणि विविध योजनांची माहिती मिळावी, या उद्देशाने तालुका विधी सेवा समिती, पाचोरा आणि श्री तपेश्वर ज्येष्ठ नागरिक मंडळ, लोहारा यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला ज्येष्ठ नागरिकांसह ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शुक्रवार, २१ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३ वाजता ज्येष्ठ नागरिक अभ्यासिका हॉल, ग्रामपंचायत कार्यालयासमोर, लोहारा येथे हे शिबिर पार पडले. पाचोरा न्यायालयातील विधी सहाय्यक किशोर डोंगरे यांनी उपस्थितांना विविध कायदेविषयक बाबींवर सविस्तर मार्गदर्शन केले. सहा महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन शिबिरात राष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिन, नागरिकांची मूलभूत कर्तव्ये, वैकल्पिक वाद निवारण पद्धती (ADR) व त्याचे फायदे, मानसिक आजार व बौद्धिक दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींसाठी NALSA Legal Services Scheme, 2024, मानव-वन्यजीव संघर्षातील पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी NALSA Scheme, 2025 तसेच गरिबी निर्मूलनाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी NALSA Scheme, 2015 या सहा महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. विधी सहाय्यक किशोर डोंगरे यांनी ज्येष्ठ नागरिकांचे कायदेशीर अधिकार, नागरिकांची घटनात्मक कर्तव्ये तसेच न्यायालयीन प्रक्रिया टाळून परस्पर सामोपचाराने वाद सोडविण्यासाठी असलेल्या ADR पद्धतीचे महत्त्व स्पष्ट केले.
तसेच गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांना उपलब्ध असलेल्या मोफत विधी सहाय्याच्या सुविधांचीही




माहिती दिली. 'कायदेशीर हक्कांची जाणीव असणे आवश्यक' ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या कायदेशीर हक्कांविषयी जागरूक राहणे आवश्यक असून, कोणत्याही कायदेशीर अडचणीच्या प्रसंगी उपलब्ध विधी सेवा यंत्रणेचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.
ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत कायदेविषयक माहिती पोहोचविण्यासाठी अशा जनजागृती शिबिरांची सातत्याने गरज असल्याचेही उपस्थितांनी नमूद केले. तपेश्वर ज्येष्ठ नागरिक संघाच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती कार्यक्रमाला तपेश्वर ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष भास्कर अंबीकर, सचिव बाबुलाल बोरसे, बाबुलाल सुतार, प्रभाकर चौधरी, ईश्वर परदेशी, अ. अ. पटेल, अमृत चौधरी, श्रावण चौधरी, मंगलदास मोरे, अ‍ॅड. एस. एस. गीते, रमेश पालीवाल, ज्ञानेश्वर राजपूत, कडुबा चौधरी, आशा काळे, चंद्रकला भडके, चंद्रभागा चौधरी, श्रीराम कलाल यांच्यासह ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सामाजिक कार्यकर्ते अभिमान बाविस्कर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीराम कलाल यांनी केले. 'न्याय सर्वांसाठी'चा संदेश तालुका विधी सेवा समितीच्या माध्यमातून ग्रामीण भागात कायदेविषयक जनजागृती करून नागरिकांना त्यांच्या हक्कांची तसेच उपलब्ध विधी सहाय्याची माहिती देण्यात येत असल्याबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. 'न्याय सर्वांसाठी' या संकल्पनेनुसार कायदेविषयक माहिती समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने आवश्यकता असल्याचे यावेळी सांगण्यात आले.ग्रामीण भागातील नागरिकांना कायदेविषयक माहिती मिळावी, त्यांच्या मूलभूत व संविधानिक हक्कांची जाणीव व्हावी तसेच गरजू नागरिकांना उपलब्ध असलेल्या विधी सेवा आणि विविध योजनांची माहिती मिळावी, या उद्देशाने तालुका विधी सेवा समिती, पाचोरा आणि श्री तपेश्वर ज्येष्ठ नागरिक मंडळ, लोहारा यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला ज्येष्ठ नागरिकांसह ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# पहाण येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे ५१वे वर्ष; बुधवारपासून भक्तिमय सोहळ्यास प्रारंभ

## हनुमान मंदिरात आठवडाभर प्रवचन, हरिपाठ व हरिकीर्तनाची मेजवानी; २ सप्टेंबरला काल्याचे कीर्तन

जन सम्राट टाईम्स

**पहाण, ता. पाचोरा | (प्रतिनिधी):** पहाण येथे ग्रामस्थ मंडळी व भजनी मंडळाच्या वतीने गेल्या ५१ वर्षांपासून सुरू असलेल्या अखंड हरिनाम (कीर्तन) सप्ताहाला बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ पासून प्रारंभ होत आहे. हनुमान मंदिर येथे दि. २६ ऑगस्ट ते २ सप्टेंबर या कालावधीत विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, सप्ताहानिमित्त गावात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. सप्ताहादरम्यान दररोज सायंकाळी ४ वाजता प्रवचन, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ आणि रात्री ९ ते ११ हरिकीर्तन असे विविध कार्यक्रम होणार आहेत. परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. विविध कीर्तनकारांची उपस्थिती सप्ताहात दररोज नामवंत कीर्तनकारांचे कीर्तन होणार आहे. बुधवार, २६ ऑगस्ट रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली बेलदारवाडी, गुरुवार, २७ ऑगस्ट रोजी कु. ह.भ.प. तेजस्विनी दीदी, पहुरी, शुक्रवार, २८ ऑगस्ट रोजी ह.भ.प. योगेश महाराज, पाचोरा, तर शनिवार, २९ ऑगस्ट रोजी ह.भ.प. बाळकृष्ण महाराज, त्र्यंबकेश्वर यांचे कीर्तन होणार आहे.रविवार, ३० ऑगस्ट रोजी ह.भ.प. सावता महाराज,



मोहाडी, सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी ह.भ.प. रेवण महाराज, काळेगाव हिंगणा, मंगळवार, १ सप्टेंबर रोजी ह.भ.प. नारायण महाराज, भडगावकर यांचे कीर्तन होणार आहे. बुधवार, २ सप्टेंबर रोजी ह.भ.प. कोमल महाराज, खेडीभोकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. सांगता दिनी विविध धार्मिक कार्यक्रम बुधवार, २ सप्टेंबर रोजी पहाटे ५ वाजता काकड आरती, सकाळी ९ वाजता काल्याचे कीर्तन आणि त्यानंतर सकाळी ११ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांच्या आगमनापर्यंत महाप्रसादाचा कार्यक्रम सुरू राहणार आहे. यावर्षीच्या महाप्रसादाचे मानकरी पुणेस्थित व्यावसायिक व पहाण गावचे रहिवासी श्री. विठ्ठल रामदास पाटील आहेत. सांगता दिनी सायंकाळी गावातून पालखी फेरी काढण्यात येणार असून, त्यानंतर हनुमान मंदिराजवळ भजन व भारूडाचा कार्यक्रम होणार आहे. या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमानंतर ५१व्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता करण्यात येणार आहे. पंचक्रोशीतील भाविकांना उपस्थितीचे आवाहन अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून गावात भक्ती, अध्यात्म, सामाजिक एकोपा आणि संस्कारांची परंपरा जपली जात आहे. नोकरीनिमित्त बाहेरगावी असलेले ग्रामस्थ, प्रतिष्ठित नागरिक, इष्ट-मित्र परिवार तसेच पंचक्रोशीतील भाविकांनी सहकुटुंब-सहपरिवार या सोहळ्यास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे नम्र आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळी व पंचक्रोशी, पहाण यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त धुळ्यात रक्तदान शिबिर

## शंभर रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग; सामाजिक बांधिलकी जपत जयंती साजरी

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** मुस्लिम समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या जयंतीनिमित्त धुळ्यातील वडजाई रोड परिसरातील पहेलवान ग्रुपच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला तरुण रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दिवसभरात सुमारे १०० रक्तदात्यांनी रक्तदान केल्याची माहिती आयोजकांनी दिली. पहेलवान ग्रुपच्या वतीने गेल्या पाच वर्षांपासून मोहम्मद पैगंबर जयंतीचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन केले



जाते. यंदाही ही परंपरा कायम ठेवत रक्तदानाच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला.
सकाळपासून रक्तदात्यांची गर्दी शिबिराला सकाळी ९ वाजता सुरुवात झाली. दुपारी २ वाजेपर्यंत ६० रक्तपिशव्यांचे संकलन झाले होते. सायंकाळपर्यंत हा आकडा १०० पर्यंत पोहोचल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याचे प्रमाणपत्र देऊन कौतुक करण्यात आले. जयंतीच्या उत्सवाला सामाजिक कार्याची जोड देत रक्तदानाचा उपक्रम राबविण्यात आल्याने परिसरातून आयोजकांचे कौतुक होत आहे.
पाच वर्षांपासून सामाजिक उपक्रमाची परंपरा पहेलवान ग्रुपकडून गेल्या पाच वर्षांपासून मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त नियमितपणे रक्तदान शिबिराचे आयोजन केले जात आहे. रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना मदत व्हावी आणि युवकांमध्ये सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. पदाधिकाऱ्यांची उपस्थिती या रक्तदान शिबिराच्या आयोजनासाठी अब्दुल हद, आईमान अन्सारी, बाबा अन्सारी, कलीम लाल अन्सारी, शोएब अन्सारी, जाहिद अन्सारी, मुसुरम अन्सारी, वसीम अन्सारी, शादाब अन्सारी, सुलतान अन्सारी, नदीम अन्सारी, फैजल अन्सारी यांच्यासह पहेलवान ग्रुपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाघोदा बु. येथे ईद-ए-मिलाद-उन-नबी उत्साहात साजरी

जन सम्राट टाईम्स

**वाघोदा बु., ता. रावेर | प्रतिनिधी** दि. २६ ऑगस्ट २०२६ : पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या जयंतीनिमित्त वाघोदा बु. येथे ईद-ए-मिलाद-उन-नबी उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने गावातील मशिदींमध्ये विशेष दुआ करण्यात आली. देशात शांतता, प्रगती, सुख-समृद्धी आणि बंधुभाव कायम राहावा, यासाठी प्रार्थना करण्यात आली. प्रमुख मार्गांवरून भव्य जुलूस विशेष प्रार्थनेनंतर गावातील प्रमुख मार्गांवरून शिस्तबद्ध जुलूस (मिरवणूक) काढण्यात



आला. या मिरवणुकीत अबालवृद्धांसह मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. धार्मिक उत्साहासोबतच शांतता आणि सामाजिक सलोखा राखण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. जुलूसदरम्यान सहभागी नागरिकांनी शिस्त व शांतता राखत उत्सव साजरा केला. त्यामुळे गावात उत्साहपूर्ण तसेच सौहार्दाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांचा चोख बंदोबस्त ईद-ए-मिलाद-उन-नबीचा उत्सव शांततेत पार पडावा आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी प्रशासनाच्या वतीने चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. प्रमुख मार्ग तसेच गर्दीच्या ठिकाणी पोलिसांची उपस्थिती ठेवण्यात आली होती. हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन ईदच्या निमित्ताने हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा देत सामाजिक एकोपा, शांतता आणि बंधुभावाचे दर्शन घडविले. धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून गावातील सलोख्याची परंपरा अधिक दृढ झाल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले. या निमित्ताने गावातील मशिदींमध्ये विशेष दुआ करण्यात आली. देशात शांतता, प्रगती, सुख-समृद्धी आणि बंधुभाव कायम राहावा, यासाठी प्रार्थना करण्यात आली. या मिरवणुकीत अबालवृद्धांसह मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# 'नारा-ए-तकबीर, अल्लाहू अकबर'च्या घोषणांनी धुळे दुमदुमले

## मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक हजारो मुस्लिम बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त धुळे शहरात मुस्लिम समाजाच्या वतीने बुधवारी भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. 'नारा-ए-तकबीर, अल्लाहू अकबर' अशा घोषणांनी शहरातील प्रमुख मार्ग दुमदुमून गेले. या मिरवणुकीत लहान बालकांपासून तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांपर्यंत हजारो मुस्लिम बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. एसपी विशाल आनंद यांच्या हस्ते मिरवणुकीला सुरुवात शहरातील मच्छी बाजार चौकातून जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या हस्ते मिरवणुकीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पोलीस



प्रशासनातील अधिकारी तसेच मुस्लिम समाजातील मान्यवर उपस्थित होते. मच्छी बाजार चौकातून सुरू झालेली मिरवणूक गल्ली क्रमांक सहा, मौलवी गंज, राजकमल टॉकीज, आग्रा रोड, फुलवाला चौक, गांधी पुतळा मार्गे पांजरा नदीकिनारी असलेल्या अंजन शहा दाता सरकार दर्ग्याजवळ पोहोचली. तेथे मिरवणुकीचा समारोप करण्यात आला. घोषणांनी आणि उत्साहाने परिसर दुमदुमला शहरातील विविध भागांतून मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झाले होते. हातात झेंडे घेतलेल्या तरुणांचा उत्साह, डीजेच्या तालावर सहभागी झालेली तरुणाई आणि धार्मिक घोषणांमुळे आग्रा रोड परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. मिरवणुकीत बालकांचाही मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून आला. पारंपरिक उत्साहात आणि धार्मिक वातावरणात मोहम्मद पैगंबर जयंती साजरी करण्यात आली. पोलिसांचा चोख बंदोबस्त मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी जिल्हा पोलीस दलाच्या वतीने प्रमुख मार्गांवर चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलीस अधिकारी व कर्मचारी मिरवणुकीदरम्यान परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. मान्यवरांची उपस्थिती यावेळी फारुख चिस्ती लक्कड, मोहसीन खाटीक, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी राजकुमार उपासे, अनिस खाटीक, गुलाम कुरेशी, जोयब खाटीक, मुजफ्फर खाटीक, अब्दुल्ला खाटीक, आकिब खाटीक, शोएब खाटीक, शवाल अन्सारी, अमीन पटेल, मुख्तार मन्सूरी यांच्यासह मुस्लिम समाजातील प्रतिष्ठित नागरिक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त आयोजित या मिरवणुकीतून धार्मिक उत्साहासोबतच सामाजिक एकोपा, शांतता आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला. मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त धुळे शहरात मुस्लिम समाजाच्या वतीने बुधवारी भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. 'नारा-ए-तकबीर, अल्लाहू अकबर' अशा घोषणांनी शहरातील प्रमुख मार्ग दुमदुमून एसपी विशाल आनंद यांच्या हस्ते मिरवणुकीला सुरुवात शहरातील मच्छी बाजार चौकातून जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या हस्ते मिरवणुकीचे उद्घाटन करण्यात आले.

# कानिफनाथ गडावर २७ ला महाप्रसादाचे आयोजन!

जन सम्राट टाईम्स

**पुणे प्रतिनिधी :** एस. एन. नांदेडकर : पुरंदर तालुक्यातील श्री क्षेत्र कानिफनाथ गड, बोपगाव येथे श्रावण महिन्यातील तिसऱ्या गुरुवारी, दि. २७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते दुपारी ३.३० वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. नगरसेवक अ‍ॅड. प्रसन्न जगताप यांच्या पुढाकारातून गेल्या अनेक वर्षांपासून हा धार्मिक व सामाजिक उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. या महाप्रसादाची तब्बल ३२ वर्षांची अखंड परंपरा असून, यंदा या उपक्रमाचे ३३ वे वर्ष आहे. त्यामुळे यंदाच्या महाप्रसाद सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. २०० रुपयांच्या वर्गणीतून सुरू झाला भंडारा महाप्रसादाच्या या उपक्रमाची सुरुवात कॉलेज जीवनात मित्रपरिवाराच्या माध्यमातून झाली होती. प्रत्येक मित्राने आपापल्या परीने थोडी-थोडी रक्कम जमा करून अवघ्या २०० रुपयांच्या वर्गणीतून पहिला भंडारा आयोजित केला होता. त्या छोट्याशा उपक्रमाने पुढे मोठे रूप घेतले आणि आज हा महाप्रसाद सोहळा धार्मिक श्रद्धेसोबतच सामाजिक बांधिलकीचे प्रतीक बनला आहे. श्रावणात लाखो भाविकांची उपस्थिती श्रावण महिन्यात श्री क्षेत्र कानिफनाथ गडावर दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक



येत असतात. विविध भागांतून येणाऱ्या भाविकांना महाप्रसादाचा लाभ मिळावा, या उद्देशाने दरवर्षी या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. भाविकांना उपस्थित राहण्याचे आवाहन यंदाच्या महाप्रसाद सोहळ्यासाठी परिसरातील तसेच दूरवरून येणाऱ्या सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन नगरसेवक अ‍ॅड. प्रसन्न जगताप यांनी केले आहे. ३३ वर्षांपासून अखंड सुरू असलेल्या या उपक्रमातून धार्मिक श्रद्धेसोबतच सेवा, सामाजिक बांधिलकी आणि सामूहिक सहभागाची परंपरा जपली जात असल्याचे यानिमित्ताने अधोरेखित होत आहे.